CMYK

बीड । रविवार

०१.०६.२०२५

वर्षे : ५ अंक : ६१

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१




# भाजपच्या 'मेघा'कृपेला 'मेगा' झटका !

## सर्वोच्च न्यायालयाने तडाखा देताच महायुती सरकारची माघार, ठाण्यातील १४ हजार कोटींच्या निविदा रद्द

**मुंबई । प्रतिनिधी**

भाजपच्या 'मेघा'कृपेला 'मेगा' झटका बसला. निवडणूक काळात भाजपला ६०० कोटींचे 'दान' देणाऱ्या मेघा इंजिनीअरिंगला कंत्राट देण्यासाठी गोलमाल करणारे महायुती सरकार सुप्रीम कोर्टात तोंडावर आपटले.

६,००० कोटींचा उन्नत मार्ग आणि आठ हजार कोटींचा ठाणे-घोडबंदर ते भाईंदर बोगदा या प्रकल्पांच्या निविदा एमएमआरडीएने रद्द केल्या. कोर्टाच्या इशाऱ्यानंतर उपमुख्यमंत्री व नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या ताब्यातील एमएमआरडीएवर ही नामुष्की ओढवली.



सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने निविदा प्रक्रिया रोखण्याचा इशारा दिल्याने हादरलेल्या एमएमआरडीएने भूमिका स्पष्ट करण्यासाठी वेळ मागून घेतला होता. अखेर शुक्रवारी १४ हजार कोटी रुपयांच्या दोन्ही प्रकल्पांची संपूर्ण निविदा प्रक्रियाच रद्द करीत असल्याची माहिती एमएमआरडीएने न्यायालयाला दिली. हा निर्णय एल अॅण्ड टीला दिलासा देणारा असल्याने न्यायालयाने या कंपनीची याचिका निकाली काढली. एमएमआरडीएने मनमानी करून तसेच अपारदर्शक पद्धतीने दोन्ही प्रकल्पांची निविदा प्रक्रिया राबवली. एल अॅण्ड टी कंपनीला कोणतीही सूचना किंवा कुठलेही कारण न देता निविदा प्रक्रियेतून अपात्र ठरवते होते.

● एमएमआरडीए विरुद्ध एल अॅण्ड टी

- एमएमआरडीएने दोन्ही प्रकल्पांसाठी २७ जुलै २०२४ रोजी निविदा मागवल्या होत्या. त्यावेळी पुरेसा वेळ न दिल्याच्या कारणावरून एल अॅण्ड टीने सर्वप्रथम उच्च न्यायालयात धाव घेतली. त्यावर एमएमआरडीएने निविदा सादर करण्याची मुदत ६० दिवसांनी वाढवली.

- प्रकरण हायकोर्टात गेल्यानंतरही एमएमआरडीएने निविदा प्रक्रियेत


पारदर्शकता ठेवली नाही. हा मुद्दा ▶▶ उर्वरित पान २ वर

# दारू पिऊन कार चालवली

## चहा पित असलेल्या MPSC च्या १२ विद्यार्थ्यांना उडवलं

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील सदाशिव पेठ परिसरात भावे हायस्कूल जवळ चहा प्यायला आलेल्या एमपीएससीच्या १२ विद्यार्थ्यांना एका कार चालकाने उडवल्याची घटना घडली. हा कार चालक दारू पिऊन कार चालवत होता हे समोर आलं आहे. दारू पिऊन कार चालवणाऱ्या ड्रायव्हरला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. यातील जखमी विद्यार्थ्यांवर उपचार सुरू आहेत. शनिवारी



संध्याकाळी पुण्यातील भावे हायस्कूलजवळ ही घटना घडली. चहाच्या टपरीवर चहा पिण्यासाठी आलेल्या १२ विद्यार्थ्यांना एका भरधाव वेगाने आलेल्या कारने उडवलं. या अपघातात तीन जण गंभीर जखमी झाले. तर नऊ विद्यार्थी किरकोळ जखमी झाले आहेत. सर्व जखमींवर संचेती आणि मोडक हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. भरधाव वेगाने कार चालवणाऱ्या ड्रायव्हरने दारू प्यायल्याचं स्पष्ट झालं आहे. त्याला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. जखमींमध्ये काही विद्यार्थी हे रविवारी होणाऱ्या एमपीएससीच्या परीक्षेला सामोरे

▶▶ उर्वरित पान २ वर

# टेन्शन वाढलं ! २४ तासात ७ जणांचा मृत्यू

## २७०० रुग्णांची नोंद, महाराष्ट्रात एका दिवसातच...

**मुंबई । प्रतिनिधी**

देशात कोरोना व्हायरसने पुन्हा एकदा हातपाय पसरायला सुरुवात केली आहे. आरोग्य विभागाच्या ताज्या आकडेवारीनुसार,देशात कोव्हिड-१९ चे सक्रिय रुग्णांची संख्या २७१० वर पोहोचली आहे. यामध्ये केरळ, महाराष्ट्र आणि दिल्लीत रुग्णांची संख्या वाढली आहे. केरळमध्ये ११४७



कोरोना रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. तर महाराष्ट्रात ४२४ कोरोना रुग्ण आढळले आहेत.

३० मे सकाळी आठ वाजेपर्यंतच्या रिपोर्टनुसार, दिल्लीत २९४ आणि गुजरातमध्ये २२३ रुग्ण आढळले आहेत. कर्नाटक आणि तामिळनाडूत १४८-१४८ रुग्णांची नोंद झाली आहे. तर पश्चिम बंगालमध्ये ११६ रुग्ण आढळले आहेत. मागील २४ तासात ७ जणांचा मृत्यूही ▶▶ उर्वरित पान २ वर

**● कोणत्या राज्यात किती कोरोना रुग्ण ?**

केरळ- १,१४७
महाराष्ट्र- ४२४
दिल्ली- २९४
गुजरात- २२३
कर्नाटक-तमिलनाडु: १४८-१४८
पश्चिम बंगाल- ११६
राजस्थान- ५१
उत्तर प्रदेश - ४२
पाँडेचेरी - ३५

# थायलंडची ओपल सुचाता यंदाची मिस वर्ल्ड 2025

## भारतातील स्पर्धेत केली ऐतिहासिक कामगिरी



**हैदराबाद । प्रतिनिधी**

येथे झालेल्या ७२ व्या मिस वर्ल्ड स्पर्धेत थायलंडच्या ओपल सुचाता हिला 'मिस वर्ल्ड २०२५'चा खिताब पटकावला आहे. असे विजेतेपद पटकावणारी ती थायलंडची पहिलीच स्पर्धक ठरली. गतसालची मिस वर्ल्ड क्रिस्टीना पिजाकोवा हिने ओपल सुचाताच्या मस्तकी मिस वर्ल्डचा क्राऊन ठेवला.

तेलंगणातील हायटेक्स एक्झिबिशन सेंटरमध्ये ३१ मे रोजी मिस वर्ल्डचा अंतिम सामना रंगला. त्यामध्ये इथिओपिया, पोलंड आणि मार्टिनिकमधील स्पर्धकांना हरवून ओपल सुचाता हिने मिस वर्ल्डचा मुकुट जिंकला.

थायलंडच्या ओपल चुआंगश्री उर्फ सुचाता चुआंगश्री हिने मिस वर्ल्ड २०२५ चा किताब जिंकून इतिहास रचला आहे. अशी कामगिरी करणारी ती थायलंडची पहिलीच स्पर्धक आहे. तिच्या या यशानंतर थायलंडमध्ये उत्साहाचं वातावरण निर्माण झालं आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

# कॉलेजमधल्या प्रेयसीसाठी जवानाने पत्नीला दिले विषारी इंजेक्शन; मृत्यू होईपर्यंत शेजारीच होता बसून

**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील वलवाडी शिवारातील रहिवासी व भारतीय सैन्यात क्लर्क असलेल्या कपिल बागुल याने आपले दुसऱ्या महिलेशी असलेले प्रेमसंबंध पत्नीला माहिती पडले म्हणून पत्नी पूजा (वय ३८) हिचा पेस्टिसाईडचे इंजेक्शन देऊन खून केल्याचे




उघडकीस आले आहे.

याप्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करून संशयित आरोपी पती कपिलसोबत आई, बहीण आणि प्रेयसी या चार जणांना अटक करण्यात आली आहे.

भारतीय सैन्यात क्लार्क पदावर कार्यरत कपित बाळू बागूल (वय ४३) याचे विवाह २०१० मध्ये धडगाव जि.जळगाव येथील पूजा हिच्याशी झाला. लग्नानंतर त्याला ९ वर्षाची मुलगी आणि सात वर्षाचा मुलगा आहे. कपिलचे शिक्षण धुळ्यातीत जयहिंद महाविद्यालयात झाले आहे. कपिलचे जयहिंद महाविद्यालयात असताना एका तरुणींशी त्याचे प्रेमसंबंध होते.

# पुणे, रायगड...' शेवटी नेपाळ बॉर्डर; निलेश मोबाईलही वापरत नव्हता, पोलिसांना कसा सापडला?

**पिंपरी । प्रतिनिधी**

वैष्णवी हगवणे आत्महत्येप्रकरणी फरार नीलेश चव्हाण याला शुक्रवारी पकडण्यात पिंपरी-चिंचवड पोलिसांना दहा दिवसांनी यश आले. नेपाळ सीमेवरून त्याला बेड्या ठोकल्या आहेत. वैष्णवीच्या मुलाची




हेळसांड करणे, चुलत्यांसह इतरांना धमकावणे याप्रकरणी चव्हाणवर गुन्हा दाखल होता. नीलेश हा भारतीय मोबाइल किंवा सिम कार्ड वापरत नव्हता. यामुळे त्याच्यापर्यंत पोहोचणे अशक्य झाले होते. चव्हाण नेपाळमधील सिम ▶▶ उर्वरित पान २ वर

# शिवराज्यभिषेक सोहळ्याला बीडसह महाराष्ट्रातील शिवप्रेमिंनी उपस्थित रहा : गंगाधर काळकुटे पाटील



**● रायगडावर मंत्रिमंडळाची बैठक घेण्याची मागणी**

**बीड । प्रतिनिधी**

रायगडावर होणारा शिवराज्यभिषेक सोहळ्यामित्ति ६ जून रोजी 'लोकोत्सव' 'धार तलवारीची, युद्धकला महाराष्ट्राची', 'जागर शिवशाहीरांचा

▶▶ उर्वरित पान २ वर

**● असे असतील कार्यक्रम**

गुरुवार, दि. ५ जून २०२५ दुपारी 03.30 वा. राजमाता जिजाऊ साहेब यांच्या समाधीस अभिवादन करून शिवराज्याभिषेक सोहळ्यास प्रारंभ (जिजाऊ समाधी स्थळ, पाचाड) दुपारी ४.वा.-युवराज

▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड शहरातील मुख्य रस्त्यावर नगरपालिकेच्या वतीने वृक्ष लागवड करावी

**● भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील**

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील मुख्य रस्त्यावर बीड नगरपालिकेने वृक्ष लागवड करून बीड शहरातील पर्यावरण वाढवावे जेणेकरून भविष्यामध्ये पाऊस शहरांमध्ये चांगला पडेल आणि शहरांमध्ये कुठेही पाण्याची कमतरता भासणार नाही आणि वृक्ष लावल्यानंतर वृक्षाचे संगोपन देखील ज्या ज्या ठिकाणी वृक्ष नगरपालिकेच्या वतीने लावण्यात येतील त्या त्या ठिकाणच्या नागरिकाने त्या वृक्षाची दक्षता घ्यावी व त्याचे रक्षण करावे व बीड जिल्ह्यातील



मानवतेचा आगळावेगळा संदेश इतर महाराष्ट्रातील शहरांना देखील घेण्यासारखा वाटेल असे कार्य करावे बीड नगर परिषदेच्या वतीने वृक्ष लागवड करण्यात यावी अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी एका प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे म्हटले आहे महाराष्ट्र शासन देखील सांगत आहे की झाडे लावा झाडे जगवा आणि संत देखील सांगतात की वृक्षवल्ली आम्हा सोयरे ही वनचरे या न्यायाप्रमाणे बीड नगर परिषदेच्या वतीने बीड शहरातील मुख्य रस्त्यावर वृक्ष लागवड करून बीड शहरातील पर्यावरण राखण्यासाठी नक्कीच मदत होईल आणि शहराचे या वृक्षाने अतिशय सुशोभीतीकरण झाल्यासारखे दिसेल.






# राजमाता लोकमाता अहिल्यामाई होळकर

ज्या मनगटात बळ, बुद्धी आणि चातुर्य आहे तोच स्वकर्तृत्वावर लोकाभिमुख राजा बनू शकतो असा क्रांतिकारी विचार देणाऱ्या व स्वकर्तृत्वावर तो विचार प्रत्यक्षात साकार करणाऱ्या राजमाता लोकमाता अहिल्यामाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी नगर जिल्ह्यातील सीना नदीच्या तीरावर चौंडी या छोट्याशा गावी आई सुशीलाबाई व वडिल माणकोजी शिंदे यांच्या पोटी झाला. वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी म्हणजे २० मे १७३३ रोजी सुभेदार मल्हारराव होळकर यांचे पुत्र खंडेराव यांच्याशी अहिल्यामाईंचा विवाह झाला. ज्या होळकरशाहीने भारताच्या मध्ययुगीन काळाच्या इतिहासावर अमीट छाप सोडली त्या होळकरशाहीचे संस्थापक अहिल्यामाईंचे सासरे मल्हारराव होळकर अतिशय शूर, कर्तबगार, उदार असल्याने या गुणांचा प्रभाव अहिल्यामाईंच्या व्यक्तिमत्त्वावर पडला. अहिल्यामाईंना बाळबोध वाचन आणि मोडी लेखन, गणितातील हिशोब इत्यादी शिक्षण दिले जात होते.

त्याचबरोबर घोड्यावर स्वार होणे, नेमबाजी, भालाफेक, दांडपट्टा चालविणे, युद्धाचे, राजकारणाचे डावपेच आखणे, स्वारी करणे, या कारणे सूचक पत्रव्यवहार करणे, कर वसुली, न्यायदान, राज्यकारभाराचे धडे असे सर्व प्रकारचे प्रशिक्षण अहिल्यामाईंनी सासरे मल्हारराव यांच्याकडून घेतले होते. प्रशासकीय ज्ञानाबरोबरच धर्म, संस्कृती, कला, साहित्य, राजकारण, अर्थकारण इत्यादी विषयांवरील पुस्तकांचे वाचन करून त्यांनी सखोल ज्ञान प्राप्त केले होते. धैर्य, चातुर्य, प्रगल्भता, राजकारण धुरंधरता, मूत्सद्दीपना, संस्कारसमृद्धता, जातीभेद धर्मभेद विरोधी भूमिका, धर्मचिकीत्सा असे गुण अंगी असलेल्या



अहिल्यामाईंना सुरुवातीपासूनच मल्हाररावांनी प्रयत्नपूर्वक राज्यकारभारात सहभागी करून घेतले होते. अहिल्याबाईंना मोठे करण्यामागे पती खंडेराव होळकर यांचे भक्कम पाठबळ होते.

अहिल्यामाईंना १७४५ मध्ये मुलगा मालेराव व १७४८ मध्ये मुलगी मुक्ताबाई ही दोन अपत्ये झाली. त्यानंतर अवघ्या सहा वर्षातच पती खंडेराव यांना सुरजमल जाटा बरोबर कुंभेरी येथे झालेल्या लढाईत २४ मार्च १७५४ रोजी विरमरण आले. तो काळ सतीप्रथेचा होता त्या काळात खंडेरावांच्या सोबत सती जाण्याचे नाकारून अहिल्यामाईंनी आपल्या पुरोगामीत्वाचा परिचय दिला. सती न गेल्यास विधवेला चीताग्नित फेकण्याची क्रूर पद्धत त्या काळामध्ये रूढ होती. अहिल्यामाईंच्या सती न जाण्याच्या निर्णयामुळे धर्माच्या ठेकेदारांनी अक्षरशः रणकंद केले पण अहिल्यामाईंचा दृढ निश्चय व सासरे मल्हाररावांचे भक्कम पाठबळ यामुळे कोणाचे काही चालले नाही. अहिल्यामाईंनी धर्म, रूढी, प्रथा, परंपरा यापलीकडे कर्तव्य महत्त्वाचे मानून लोककल्याणासाठी जगण्याचा निर्धार केला. ज्या रुढी, प्रथा, परंपरा अंधाराकडून प्रकाशाकडे नेतात त्याच आम्हाला मान्य आहेत अशी ठाम भूमिका घेत त्यांनी धार्मिक भावना जपून चुकीच्या रुढी, प्रथा, परंपरांना छेद दिला. सतीप्रथा, हुंडाप्रथा, बालविवाह यास विरोध करत धर्मचिकित्सेला प्रारंभ करणाऱ्या अहिल्यामाईंचे विचार आणि कृती दोन्ही क्रांतीकारकच होते. वयाच्या अवघ्या २९ व्या वर्षी अहिल्यामाईंच्या पदरी वैधव्य आले. त्यावेळी मुलगा नऊ वर्षाचा व मुलगी सहा वर्षाची होती. एवढ्या कमी वयात वैधव्य येऊनसुद्धा न डगमगता जीवनाच्या पुढील प्रवासाकरता त्या स्वतः सावरल्या. आलेल्या संकटाला धाडसाने, धैर्याने सामोरे कसे जावे हे अहिल्यामाईंकडुन शिकण्यासारखे आहे. अहिल्यामाईंच्या राज्यात अस्पृश्यतेला, धर्मभेद व जातीभेदाला थारा नव्हता. त्यांनी अस्पृश्यांना जवळ केले, ममतेची फुंकर घालून त्यांना ह्रदयाशी लावले. आपण राजमाता असण्याबरोबरच लोकमाता आहोत या भावनेतून त्यांनी लोकांना जवळ केले. अहिल्यामाईंचा जनकल्याणाचा आदर्श समोर ठेवत महात्मा फुले यांनी भारतात अस्पृश्यांसाठीची पहिली शाळा उघडली तिचे नाव अहिल्याआश्रम ठेवले. अहिल्यामाईंकडून जनकल्यानाचा आदर्श घेत छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात गोरगरिबांसाठी जो दवाखाना उघडला त्याचे नामकरण अहिल्याबाई होळकर स्मरणार्थ दवाखाना असे केले होते. राज्यकारभार हाती घेतल्यानंतर अवघ्या एक महिन्यात अहिल्यामाईंनी राज्याची घडी नीट बसवली. सर्व अपप्रवृत्ती ठेचून काढल्या. जनतेवर अत्याचार करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जरब बसवली, जनहितार्थ कायद्यात सुधारणा करून त्यांच्या कार्यकाळात कर पद्धती ही सौम्य केली. ग्रामीण भागात गावोगावी न्यायनिवाडा करण्यासाठी पंच अधिकारी नेमले. अहिल्यामाईंनी आपल्या कारकिर्दीत हिंदू – मुस्लिम यांच्यामध्ये भावनिक व सामाजिक ऐक्य निर्माण केले. मुस्लिमांना सैन्यात व प्रशासनात स्थान दिले. उत्तम जीवन जगण्यात जातीपातीचा अडसर ठरू नये म्हणून आंतरजातीय विवाहास संमती दिली व याची सुरुवात स्वतःच्या घरापासून केली. अठरापगड जाती धर्माच्या लोकांना जे मुख्य प्रवाहापासून गावगाड्यापासून लांब हलाखीचे जीवन जगत होते त्यांना एकत्र करून मानवता हाच प्रमुख धर्म आहे व आपण सर्व एकच आहोत व एक होऊन कार्य करू अशी शिकवण दिली. त्यामुळे जातीयवादाला होळकर संस्थानात स्थान नव्हते हे दिसून येते. न्याय, समता, बंधुत्व प्रस्थापित करून जातीय उच्चनीचतेचे त्यांनी उच्चाटन केले होते. राज्यकारभार व्यवस्थेचा जन्मच मुळात प्रजेच्या हितासाठी व कल्याणसाठी आहे असे त्या मानत असत. राज्याचे रक्षण ,प्रजेचे रक्षण, तिच्या हिताचे आणि सुखसोयींचे संरक्षण व संवर्धन व प्रजेला नैतिक सहकार्य हेच शासनाचे प्रमुख कर्तव्य आहे व तोच खरा धर्म आहे असे त्या मानत. त्यांनी त्यांच्या संस्थानात कायम दुष्काळ असणाऱ्या भागात तलाव, विहिरी, घाट व कुंडांची निर्मिती करून लोकांच्या गैरसोयी दूर केल्या. शेतकऱ्यांना आर्थिक मदत केली. भ्रष्टाचार होणार नाही याची काळजी घेण्यात आली. हे सर्व करत असताना अहिल्यामाईंना अनेक संकटांबरोबरच दुःखाचे पर्वतही पार करावे लागले. वयाच्या अवघ्या २९ व्या वर्षी पती खंडेरावांच्या वीर मरणाने अहिल्याबाई यांच्या पदरी वैधव्य आले. त्यानंतर अवघ्या बारा वर्षात २६ मे १७६६ रोजी सासरे मल्हारराव यांचे निधन झाले. पुढे एक वर्षाच्या आतच १७६७ मध्ये मुलगा मालेराव यांचे वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी निधन झाले. पुढे मुलगी मुक्ताबाईंचा मुलगा नथू राज्याचा वारस करावा असा अहिल्याबाईंचा माणस होता परंतु १७८७ मध्ये त्यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. पुढे जावई यशवंतराव फणसे यांचे १७९१ मध्ये निधन झाले. मुलगी मुक्ताबाई व दोन सुना अहील्यामाईंची इच्छा नसताना सती गेल्या. एका मागून एक दुःखाचे डोंगर कोसळत होते तरी अहिल्यामाई या सर्व प्रसंगांना धिराने व धाडसाने सामोरे गेल्या. अहिल्यामाई रणांगणात समशेर गाजविणाऱ्या कर्तबगार रणरागिणी तर होत्याच पण त्याचबरोबर मनानेही त्या तेवढ्याच खंबीर होत्या. हे राज्य माझ्या पूर्वजांनी तलवारीच्या बळावर रक्ताचे पाणी करून जिंकले आहे भाट भडवेगिरी करून नव्हे त्यामुळे माझ्या पूर्वजांनी मिळवलेल्या स्वराज्यासाठी माझे रक्त सांडले तरी चालेल अशी ठाम भूमिका घेत साध्या वेशामध्ये, साध्या आसनावर बसून त्यांनी राज्यकारभार केला. संपूर्ण भारतभरात मंदिरे बांधणे, मंदिरांचा जीर्णोद्धार करणे, नद्यांवर घाट बांधणे, पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी खोदणे, पाय विहिरी बांधणे, धर्मशाळा बांधणे, अन्नछत्रे चालवणे अशा प्रकारची फार मोठी लोककल्याणकारी कामे अहिल्यामाईंनी त्या काळात केली. त्यांच्या लोककल्याणकारी कार्याच्या खुणा आजही देशभरामध्ये दिसतात. अशा कर्तृत्ववान राजमाता लोकमाता अहिल्यामाई होळकर यांचा मृत्यू १३ ऑगस्ट १७९५ रोजी झाला जयंतीनिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन.

**– ह. भ. प.. संतोष महाराज डोंगरे, जिल्हाध्यक्ष, संत गाडगेबाबा प्रबोधन कक्ष, बीड**

## पान १ वरून पुढे...

### भाजपच्या...

उपस्थित करीत एल ॲण्ड टीने दोन याचिका दाखल केल्या. कंपनीने १३ डिसेंबर २०२४ रोजी तांत्रिक निविदा सादर केली होती आणि निविदा १ जानेवारी २०२५ रोजी खुली केली होती. तथापि, मूल्यांकनाबाबत एमएमआरडीएने काहीच कळवले नाही. – एमएमआरडीएने १३ मे रोजी आर्थिक निविदा खुल्या केल्या आणि त्यासाठी निवडक निविदाधारकांना बोलावले. त्यावेळी प्रक्रियेत आपल्याला वगळल्याचे एत ॲण्ड टी कंपनीच्या लक्षात आले. या माध्यमातून एमएमआरडीएने नैसर्गिक तत्त्वाचे उल्लंघन केले, असा दावा करीत एल ॲण्ड टीने उच्च न्यायालयात धाव घेतली. – उच्च न्यायालयाच्या सुट्टीकालीन खंडपीठाने दोन्ही प्रकल्पांच्या आर्थिक निविदांना स्थगिती देण्यास नकार दिला होता. त्यानंतर एल ॲण्ड टी पंपनीने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती.

### दारू पिऊन...

जाणार होते. अरुंद गल्लीत भरधाव वेगाने कार आली पुण्यातील भावे हायस्कूलचा परिसर म्हणजे अरुंद रस्ते आणि छोटी गल्ली असलेला परिसर. असं असतानाही कार चालक भरधाव वेगाने आला. त्यामुळे त्याचे कारवरील नियंत्रण सुटलं आणि समोर चहा पित असलेल्या विद्यार्थ्यांना त्याने उडवलं. जखमींमध्ये तीन मुलीही असल्याची माहिती आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे. घटनेची माहिती मिळताच त्या ठिकाणी वरिष्ठ अधिकारी आणि स्थानिक आमदार हेमंत रासणे उपस्थित राहिले. हेमंत रासणे यांनी मुख्यमंत्र्यांना या घटनेची माहिती दिली. या सर्व विद्यार्थ्यांवर तातडीने उपचार करण्यात यावेत असा आदेश मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. यांचा जो काही खर्च असेल तो शासन करणार आहे. या अपघातात जखमी झालेले काही विद्यार्थी हे रविवारी होणाऱ्या एमपीएससीच्या परीक्षेला सामोरे जाणार आहेत. पण त्यांची सध्याची परिस्थिती गंभीर आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांसंदर्भात काही वेगळा मार्ग निघू शकतो का यावरही विचार करण्यात येणार आहे.

### टेन्शन वाढलं...

झाला आहे. तर दिल्ली, गुजरात, कर्नाटक, पंजाब आणि तामिळनाडूत एका कोरोना रुग्णाचा मृत्यू झालाय. महाराष्ट्रात २४ तासात किती रुग्ण आढळले? दिल्लीत ६० वर्षीय महिलेचा मृत्यू झाला आहे. राष्ट्रीय राजधानीमध्ये २४ तासात ७७ रुग्णांची नोंद झाली. त्यानंतर केरळमध्ये २४ तासात ७२ आणि महाराष्ट्रात नव्या ३४ रुग्णांची नोंद करण्यात आलीय. मागील आठवड्यात (२५ मे पर्यंत) कोव्हिड रुग्णांमध्ये पाच टक्क्यांनी वाढ झाल्याचं समोर आलं होतं. त्यामुळे कोरोना रुग्णांची संख्या १००० च्या पुढे गेली होती. केरळमध्ये सर्वात जास्त टेस्ट करण्यात आल्या. मिझोराममध्येही कोरोनाचे दोन रुग्ण आढळले आहेत.

### थायलंडची ओपल...

कोण आहे ओपल सुचाता चुआंगश्री? तिचा जन्म २० मार्च २००३ रोजी फुकेत शहरात झाला. ओपल सध्या थायलंडच्या प्रतिष्ठित थम्मासात विद्यापीठात आंतरराष्ट्रीय घडामोडींचा अभ्यास करत आहे. ती थाई, इंग्रजी आणि चिनी भाषांमध्ये प्रवीण आहे.

ओपलने यापूर्वी अनेक सौंदर्य स्पर्धा जिंकल्या आहेत. तिने मेक्सिको सिटीमध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय मिस युनिव्हर्स २०२४ मध्ये भाग घेतला होता. त्यामध्ये ती तिसरी उपविजेती होती. यानंतर तिने मिस वर्ल्ड थायलंड २०२५ चा मुकुटही जिंकला होता. आता मिस वर्ल्ड मुकुटावर तिने आपलं नाव कोरलं आहे. टॉप ३ स्पर्धक कोण? 'मिस वर्ल्ड २०२५' स्पर्धेत इथिओपियाची हसेट डेरेजे हिने पहिली रनर-अपचा खिताब जिंकला. पोलंडची माजा क्लाज्दा दुसरी रनर-अप ठरली. तर मार्टिनिकची ऑरेली जोआकिम तिसरी रनर-अप ठरली.

### कॉलेजमधल्या प्रेयसीसाठी...

या तरुणीचे लग्न २००७ ला एका इसमार्शी झाले. तिला देखील १७ आणि १३ वर्षाच्या दोन मुली आहेत. तिचा घटस्फोट अंतिम टप्यात आहे. काही वर्षी पूर्वी ती आणि कपिल पुन्हा भेटले आणि ते लॉजमध्ये देखील भेटू लागले. कपिलचे प्रेम प्रकरण पुजाला माहिती पडते. पत्नी पुजाचा काटा काढण्याचा प्लॅन तयार केला. त्यानुसार कपिलने गुरुवारी सायंकाळी पुजाता पेस्टिसाईडचे इंजेक्शन दिले. इंजेक्शनमुळे पुजाचा मृत्यू झाला. तिला श्री गणेश हॉस्पिटलमध्ये नेले. हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी पुजाता सिव्हील हॉस्पीटलमध्ये न्यायला सांगितले. मात्र कपिलने इतरांच्या मदतीने तिचा अंत्यविधीची तयारी सुरु केली. दरम्यान, पुजाच्या भाऊ भूषण शिवाजी महाजन (वय ३५) रा. भडगाव याता कपिलने मोबाईलवरुन सांगितले की, पुजाचा मृत्यू झाला आहे. तू लगेच निघ. हे ऐकल्यावर भूषण हा आपल्या नातेवाईकांसोबत तातडीने धुळ्यात दाखल झाला. दरम्यानच्या काळात याबाबत देवपूर पश्चिम पोलिस स्टेशनला ही माहिती कळाली. तातडीने घटना स्थळी येऊन पोलिसांनी पूजाचा मृतदेहाचे पोस्टमार्टमसाठी पाठविला. पश्चिम देवपूर पोलिस स्टेशनला यासंदर्भात खूनाचा गुन्हा दाखल करण्याचे काम रात्री उशीरापर्यंत सुरु होते. दरम्या पोलिसांनी पुजाचा पती कपिल बागुल, सासू विजया बाळू बागूल, नणंद रंजना धनेश माळी रा. छत्रपती संभाजीनगर आणि प्रेयसीला अटक केली आहे.

### पुणे, रायगड...

कार्डद्वारे तिथले इंटरनेट वापरत असे. तो एकटाच राहत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. आठ पथके मागावर होती– चव्हाणच्या शोधासाठी पोलिसांनी आठ पथकांची स्थापना केली होती. अँटी गुंडा स्कॉड आणि पुणे क्राइम ब्रँच संयुक्तपणे कारवाई करीत होती. या पथकांनी विविध ठिकाणी तपास सुरू केला. यामध्ये पुणे, मुंबई, कोकण, तसेच कर्नाटक आणि गोवा भागांचा समावेश आहे. त्याचबरोबर त्याचे मित्र, नातेवाईक व संपर्क असलेल्या व्यक्तींकडेही चौकशी सुरू केली होती. त्यानंतर दहा दिवसांनी अटक केली आहे.

पुणे ते नेपाळ नीलेश पोलिसांना कसा सापडता– आत्महत्या प्रकरणात पोलिसांनी हगवणे कुटुंबातील सर्वच आरोपींना अटक केली असून, सध्या ते पोलिस व न्यायालयीन कोठडीत आहेत. यातील एक आरोपी चव्हाण हाही पोलिसांच्या ताब्यात सापडला आहे. पुणे, मुंबई, कर्जत, रायगड असा प्रवास केला, रायगडनंतर नीलेश दिनांक २१ मे रोजी महाराष्ट्राबाहेर पडला.. दिनांक २५ मे रोजी खासगी ट्रॅव्हल्सने उत्तर प्रदेशच्या गोरखपूर येथून दिल्लीला गेला. ज्या बसने तो प्रवास करत होता, त्या वातानुकूलित बसमधील प्रवासाचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले होते. त्यात नीलेश दिसून आला. स्लीपर सीटवरून उतरत असताना, हाती पाण्याची बाटली घेतलेला नीलेश चव्हाण बिनधास्तपणे फिरताना पाहायला मिळाला. त्याने त्यानंतर सोनोली (उत्तर प्रदेश), भैरवा (नेपाळ) आणि काठमांडू येथे पोहोचला. नेपाळमधून भैरवामार्गे सोनोलीमध्ये आल्यावर नीलेशला अटक केली. पाच दिवस तो नेपाळमध्येच मुक्कामी होता, असे पोलिसांचे मत आहे.

### शिवराज्यभिषेक सोहळ्याला...

स्वराज्याच्या इतिहासाचा' व 'सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा' यासह विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या आकर्षण ऐतिहासिक सोहळ्याचे बीडसह महाराष्ट्रातील शिवप्रेमिंनी साक्षिदार व्हावे असे अवाहन शिवराज्यभिषक सोहळा समितीचे सदस्य गंगाधर काळकुटे पाटील यांनी केले. चौंडीच्या धर्तीवर रायगडावरही मंत्रिमंडळाची बैठक घेण्यात यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.

बीड शहरातील शासकीय विश्रामगृह येथे शनिवार दि. ३१ मे रोजी दुपारी १ वाजता पत्रकार परिषदेचे अयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी ऋषिकेश बेदरे पाटील, गोपाळ धांडे, संजय गोडसे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना गंगाधर काळकुटे पाटील म्हणाले की, रायगडावर विविध विकास कामे व्हावेत यासाठी चौंडीच्या धर्तीवर रायगडावरही मंत्रिमंडळाची बैठक घेण्यात यावी अशी मागणी राज्यभरातून होत आहे. या मागणीची शासनाने दखल घ्यावी. शिवरायांच्या प्रेरणेने मर्द मराठ्यांच्या तलवारी याच मातीत तळपल्या आणि स्वराज्याचे स्वप्न साकार झाले. हजारो मावळ्यांच्या, सर्वसामान्यांच्या बलिदानातून महाराष्ट्रभूमी पावन झाली. दुर्गराज रायगडावर शिवरायांचा ६ जून १६७४ ला 'राज्याभिषेक' झाला. मोठ्या थाटामाटात राज्याभिषेकाचा सोहळा पार पडला. जन् सार्वभौम राज्य स्थापन झाल्याची द्वाही दाहीदिशा फिरली. या ऐतिहासिक क्षणाची स्मृती सदैव राहावी, या हेतूने प्रतिवर्षी ६ जून रोजी दुर्गराज रायगडावर भव्य प्रमाणात शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीतर्फे दुर्गराज रायगडावर ५ व ६ जून २०२५ रोजी शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे मार्गदर्शक युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा होत आहे. तरी बीडसह महाराष्ट्रातील शिवप्रेमिंनी उपस्थित रहावे असे आवाहन गंगाधर काळकुटे पाटील यांनी केले.

**● असे असतील...**

संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांचे भव्य स्वागत व शिवभक्तांच्या समवेत पायी गड चढण्यास प्रारंभ (स्थळ नाणे दरवाजा)

दुपारी 0४.1५ वा. गडपूजन अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समिती व रायगड जिल्हा प्रशासन यांच्या उपस्थितीत, (स्थळः नगारखाना)दुपारी 0४.30 वा. युवराज्ञी संयोगीताराजे छत्रपती महाराज यांच्या हस्ते 'धार तलवारीची.. युद्धकला महाराष्ट्राची.... युद्धकलेच्या प्रात्यक्षिकास प्रारंभ (स्थळः होळीचा माळ)

सायं. 0७.00 वा. ढोलवादन, लेझीम प्रात्यक्षिके व वारकरी संप्रदायाकडून टाळ मृदंगाचा गजर (स्थळः होळीथा माळ)

रात्री 0८.00 वा. जागर शिवशाहिरांचा.. स्वराज्याच्या इतिहासाचा... (स्थळः राजसदर)

रात्री 01.00 वा. गडदेवता शिरकाई देवीचा गोंधळ (स्थळ: शिरकाई मंदिर)

रात्री 0९.30 वा. वारकरी संप्रदायाकडून कीर्तन व भजन (स्थळः अगदीश्वर मंदिर)

शुक्रवार, दि. ६ जून २०२५

सकाळी 0७.00 वा. युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांचे शुभहस्ते पारंपारिक वाद्यांच्या गजरात ध्वजपूजन व ध्वजारोहण (स्थळः नगारखाना)

सकाळी 0७.30 वा. शाहिरी कार्यक्रम (स्थळः राजसदर)

सकाळी 0९.30 वा. श्री शिवछत्रपती महाराजांच्या पालखीचे राजसदरेवर आगमन

## पान ४ वरून पुढे...

### सुनंदा प्रशांत...

तुकाराम येवले आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन अशोक वाडेकर व गोविंद गोचडे यांनी केले.

यावेळी बोलताना प्रमुख व्याख्याते डॉ. अशोक बांगर म्हणाले की, राजाच्या मनामध्ये रयतेप्रती कोणता भाव आहे? हा विषय सगळ्यात महत्वाचा असतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनामध्ये, ' हे राज्य व्हावे ही तो श्रींची इच्छा' हा भाव होता. आणि याच भावनेतून ईश्वराला समर्पित राज्यकारभार महाराजांनी केला. त्याच धर्तीवर राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी शिवाला अर्थात शंकराला समर्पित असा राज्यकारभार केला. केवळ राज्यातच नव्हे तर संबंध भारतवर्षात अहिल्यादेवींनी स्वतःच्या खाजगी संपत्तीतून मंदिरे, अन्नछत्रे, तलाव, पानवठे आदि समाजाभिमुख व लोकोपयोगी कामे पार पाडल्याचेही बांगर म्हणाले. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या १३ महिलांचा अहिल्यारत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये संगीता श्रीराम पांडे, आशा नामदेव साबळे, सत्यभामा संतोष मोरे, सुमित्रा राजाभाऊ सोन्नवर, पार्वती हरिदास तपसे, विद्या महादेव रासवे, सुगना सत्यनारायण तेला, इंदुबाई राजाराम अन्नदाते, राणी चंद्रकांत पोपळे, उर्मिला राजाभाऊ काळे, मीनाक्षी देवकते (डोमाळे), सुनिता राजेश कुलथे यांचा समावेश आहे. याच कार्यक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित वक्तृत्व व निबंध स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाजपाचे शहराध्यक्ष विनायक मामा रत्नपारखी, अभिजीत सोळंके, रूपाली कचरे, प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर , ज्ञानेश्वर सरोदे, मनोज कोरडे, विशाल देवकते, अविनाश कांडुरे आदींनी परिश्रम घेतले.

### लिंबागणेश ग्रामपंचायत....

संपुर्ण भारतभर मंदिरे बांधणे,मंदिरांचा जीर्णोद्धार,नद्यांवर घाट बांधणे, पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी खोदणे, धर्मशाळा बांधणे, अन्नछत्रे चालवणे आदी लोककल्याणकारी कार्याच्या खुणा आजही भारतभर दिसून येतात.२४ मार्च १७५४ मध्ये पती खंडेराव यांना सूरजला जाट बरोबर कुंभेरी येथे झालेल्या लढाईत वीर मरण आले. तो काळ सती प्रथेचा होता. त्या काळात खंडेरायांच्या सोबत सती जाण्याचे नाकारून अहिल्यामाईंनी आपल्या पुरोगामित्वाचा परिचय दिला होता .आता अहिल्यामाईंनी धर्म,प्रथा, रूढी ,परंपरा या पलीकडे कर्तव्य महत्त्वाचे मानुन लोककल्याणासाठी जगण्याचा निर्धार केला. ज्या रूढी, प्रथा, परंपरा अंधाराकडुन प्रकाशाकडे नेतात त्याच आम्हाला मान्य आहेत अशी ठाम भूमिका घेतली. धार्मिक भावना जपत चुकीच्या पुढे परंपरांना छेद दिला. सतीप्रथा, हुंडाप्रथा, बालविवाह यास विरोध करत धर्म चिकित्सेला प्रारंभ करणाऱ्या अहिल्यामाईंचे विचार आणि कृती क्रांतिकारक आणि प्रेरणादायी होती.अहिल्यामाई होळकर यांनी महिला सशक्तीकरणावर विशेष भर दिला होता .विधवा स्त्रियांसाठी कायद्यात बदल केले. त्यांना मुल दत्तक घेण्याचा अधिकार, उदरनिर्वाहाकरीता पतीच्या संपत्तीत अधिकार मिळवून दिला. शिवाय दत्तक पत्रावर आकारला जाणारा नजराणा( कर ) रद्द केला. स्त्रीसक्षमीकरणाच्या दृष्टीने ही पावले क्रांतीकारक होती असे प्रतिपादन केले. यावेळी राजेभाऊ गिरे, अनंतकाका मुळे,उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, रमेश गायकवाड, समीर शेख, अशोक जाधव, सुरेश निर्मळ, युवराज गिरे, रामचंद्र मुळे,आदी उपस्थित होते. ग्रामपंचायतीच्या वतीने पुरवठा निरीक्षक पदी नियुक्त प्रथमेश गिरे व गट प्रवर्तक सिमा वखरे व ज्योती गिरे यांचा सन्मान –लिंबागणेशचे भुमिपुत्र प्रथमेश राजेभाऊ गिरे यांची पुरवठा निरीक्षक पदी बुलढाणा येथे नियुक्ती झाल्याबद्दल शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याचवेळी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा गट प्रवर्तक सिमाताई वखरे व ज्योती गिरे यांचा ग्रामपंचायतच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त सन्मान पत्र,रोख पाचशे रुपये आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी...

मार्गदर्शनाखाली या अंकाची निर्मिती करण्यात आली आहे. अंकाच्या मुखपृष्ठावर जन्म त्रिशताब्दी निमित्ताने तयार करण्यात आलेले बोधचिन्ह आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनकार्य, त्यांचे महाराष्ट्रातील कार्य, धर्मपरायणता, समाजकार्य, राज्यकारभाराचा आदर्श, दातृत्व, त्यांनी उभारलेल्या विविध वास्तूंची माहिती अंकात देण्यात आली आहे. अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनाविषयी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह विविध मान्यवरांनी लिहिलेले लेख अंकात समाविष्ट आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजनेसह शासनाने जन्म त्रिशताब्दी उत्सवानिमित्त घेतलेल्या महत्वपूर्ण निर्णयांची माहिती देखील या अंकात देण्यात आली आहे.

### महेश नवमी...

पार्थिव शिवलिंग पूजन– महेश नवमीच्या दिवशी, ४ जून रोजी सायंकाळी ५.३१ वाजता महेश्वरी समाजाच्या उत्पत्तीच्या साक्षीभूत वेळेस पार्थिव शिवलिंग पूजन आयोजित करण्यात आले आहे. हे पूजन अक्षता मंगल कार्यालय, परळी येथे होईल. हा पवित्र पूजन सोहळा भक्तिभावाने साजरा करण्यात येणार असून, अधिकाधिक नागरिकांनी यामध्ये सहभागी होऊन पुण्यलाभ घ्यावा. या चार दिवसांच्या महेश नवमी सप्ताहामध्ये समाजसेवा, पर्यावरण जागृती, धार्मिक आस्था आणि सांस्कृतिक जपणूक यांचे उत्तम उदाहरण युवा माहेश्वरींनी सादर केले आहे. सर्वांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा व उपस्थित राहून आयोजन यशस्वी करावे, असे आवाहन युवा माहेश्वरी परळी वैजनाथच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी केले आहे.

### श्रीक्षेत्र बाभळगाव...

अशोक रुस्तमराव लाटे, ज्ञानेश्वर नामदेव जगताप, ज्ञानोबा लक्ष्मण डाके, भारत सर्जेराव लाटे, लक्ष्मण शिवराम सुरवसे, आत्माराम प्रभाकर शिंदे, बळीराम काशिनाथ गोरे, अशोक गिण्यानदेव बचले, हनुमान दिलीप लाटे, सौ शिवकन्या बळीराम डाके, शिवाजी जगन्नाथ भारती, दाजीबा जयवंत उगले, नानाभाऊ सिद्राम लाटे, भगवान गोपाळ बडे, नारायण दामोदर पांचाळ यांची विश्वस्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. तसेच अंगद मारुती शिंदे यांची पुजारी म्हणून नेमणूक करण्यात आली.

### आयुक्त जितेंद्र...

पदभार स्विकारला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर आयुक्त अनंत गव्हाणे, अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी यांनी श्री पापळकर यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. यावेळी नगरविकास विभागाचे सहआयुक्त देविदास टेकाळे यांच्यासह प्रादेशिक विभागप्रमुख उपस्थित होते. विभागीय आयुक्त श्री पापळकर यांनी विभाग प्रमुखांशी संवाद साधत विभागातील माहिती जाणून घेतली. नवनियुक्त विभागीय आयुक्त श्री. पापळकर हे २०१० च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. त्यांनी यापूर्वी चंद्रपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अकोला जिल्हाधिकारी, हिंगोली जिल्हाधिकारी, धुळे जिल्हाधिकारी म्हणून काम

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# भारतीय रेल्वेचा उपक्रम; ‘छत्रपती शिवाजी महाराज सर्किट’ विशेष ट्रेनचा लाभ घ्यावा - जिल्हाधिकारी डॉ. पाटील

**बुलडाणा । प्रतिनिधी**

रेल्वे पर्यटन महामंडळाने (आयआरसीटीसी), ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा अनुभव देण्यासाठी ‘छत्रपती शिवाजी महाराज सर्किट’ या एका विशेष ट्रेनची घोषणा केली आहे. युवक, विद्यार्थी, इतिहासप्रेमी व नागरिकांनी या उपक्रम ाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.




ही यात्रा भारत गौरव टुरिस्ट ट्रेन (भारत गौरव टुरिस्ट ट्रेन) अंतर्गत ९ जून रोजी मुंबई येथून सुरू होत आहे. या ५ दिवसांच्या विशेष टूरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट, इतिहासावर आधारीत कार्यक्रम असणार आहेत. या सहलीद्वारे महाराष्ट्रातील विविध ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व असलेल्या ठिकाणांचा पर्यटकांना अनुभव घेता येणार आहे.

ही केवळ एक यात्रा नसून, आपल्या वैभवशाली परंपरेचा, सांस्कृतिक वारशाचा आणि स्वाभिम ानी इतिहासाचा साक्षात अनुभव घेण्याची सुवर्णसंधी आहे. भारतीय रेल्वे विभाग आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांनी ऐतिहासिक उपक्रमासाठी विविध अंगांनी सुसज्ज तयारी केली आहे. भारत गौरव ट्रेन ज्या-ज्या ठिकाणी पोहोचेल, त्या ठिकाणी असलेल्या पर्यटन स्थळांची सविस्तर माहिती पर्यटकांना देण्यात येणार आहे.

सहल तपशील : सहलीचे नाव: छत्रपती शिवाजी महाराज सर्किट शुभारंभ दि. ९ जून २०२५ कालावधी: ५ दिवसांची यात्रा (सकाळी समाप्ती) प्रारंभ व समाप्ती स्थान: छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी), मुंबई प्रवास सुरु व संपण्याचे स्थानकं: दादर, ठाणे यात्रेचा प्रवासम ार्ग- मुंबई (सीएसएमटी) - रायगड - पुणे - शिवनेरी - भीमाशंकर - प्रतापगड - कोल्हापूर - पन्हाळा - मुंबई.

पॅकेज मध्ये समाविष्ट सेवा: भारत गौरव ट्रेनने प्रवास (एसएल/३एसी/२एसी/एसी/ नॉन-एसी) हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था सर्व ठिकाणी स्थानिक वाहतूक व गाईड ऑनबोर्ड व ऑफबोर्ड शुद्ध शाकाहारी भोजन प्रवास विमा, सर्व प्रवेश शुल्क (किल्ले, मंदिरे, रोपवे, शिवसृष्टी इत्यादी), सुरक्षा व्यवस्था.

दैनंदिन टूर कार्यक्रम (संक्षिप्त): पहिला दिवस: मुंबई - रायगड - पुणे. दुसरा दिवस: पुणे (लाल महाल, शिवसृष्टी, कसबा गणपती). तिसरा दिवस: शिवनेरी - भीमाशंकर - पुणे. चौथा दिवस: प्रतापगड - कोल्हापूर. पाचवा दिवस: कोल्हापूर - महालक्ष्मी मंदिर - पन्हाळा किल्ला - मुंबई. सहावा दिवस: मुंबई (टूर समाप्त).

अधिक माहितीसाठी भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाच्या (आयआरसीटीसी) वेबसाईट: www.irctctourism.com अधिकृत संकेतस्थळाला भेट देणे उपयुक्त ठरेल.

## नुकसानीचे पंचनामे तात्काळ पुर्ण झाल्यावर शासनाकडून निश्चीतपणे मदत : मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील

**● फलटण तालुक्यातील बाधित गावांना भेट देऊन नुकसानीची पाहणी**

**सातारा । प्रतिनिधी**

सातारा जिल्ह्यात इतर तालुक्यांच्या तुलनेत फलटण, माण, खटाव या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी होऊन नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे तात्काळ पूर्ण करुन भरपाईसाठी त्वरीत सादर करावेत, एकत्रितपणे पंचनामे राज्यशासनाला प्राप्त झाल्यावर शासन निकषानुसार निश्चितपणे मदत करेल अशी ग्वाही मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी दिली. फलटण तालुक्यातील फलटण शहरासह बाधित गावांची भेट देऊन अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीची पाहणी मदत व पुनर्वसन मंत्री श्री. पाटील यांनी केली. यावेळी फलटणचे आमदार सचिन पाटील, प्रांताधिकारी प्रियांका आंबेकर, पोलीस उपविभागीय अधिकारी राहुल धस, तहसीलदार डॉ.अभिजीत जाधव, मुख्याधिकारी निखिल मोरे, प्रभारी गट विकास अधिकारी श्री. कुंभार आदी उपस्थित होते.



गेल्या अनेक वर्षात महाराष्ट्रात मान्सून पूर्वी असा पाऊस कधी झाला नसून असा प्रथमच मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्याचे पाहणी प्रसंगी सांगून मंत्री श्री. पाटील म्हणाले, आतापर्यंत झालेल्या पंचनाम्यानुसार अतिवृष्टीने घरांची पूर्णत: पडझड झाली आहे. शेतपीकांचे नुकसानही मोठ्या प्रमाणात झाले असून बागायती व फळपिकांखालील क्षेत्र बाधित झाले आहे. अंगणवाडी, शाळांसह सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी जनावरेही मयत झाली आहेत. अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीच्या पंचनाम्याचे काम ८० टक्के पूर्ण झाले असून राहिलेले पंचनामे पूर्ण करण्याचे युध्दपातळीवर काम सुरु आहे. भरपाईसाठीचे प्रस्ताव सादर करण्यासाठीच्या सूचना मदत व पुनर्वसन विभागाकडून दिल्या आहेत. यंत्रणांनी पंचनामे त्वरीत पूर्ण करावेत. रस्ते, पूल, बंधाऱ्याचे नुकसान झाले आहे, काही ठिकाणी नदीचे पात्र बदलले आहे. त्यांच्या दुरुस्तीचेही प्रस्ताव संबंधित यंत्रणांनी तात्काळ सादर करावेत अशा सुचना दिल्या.


अतिवृष्टीने ज्या घरात पाणी शिरले आहे, त्या घरातील नागरिकांना स्थलांतर करून त्यांच्या जेवणाची, रेशनची व्यवस्था स्थानिक प्रशासनाकडून व सेवाभावी संस्थाकडून करण्यात आली आहे, अशी माहितीही मकरंद पाटील यांनी दिली.

## गुजर समाजाच्या विद्यार्थ्यांस अडचण आल्यास समाज म्हणून एकत्र येवू: रतन गुजर

**बीड । प्रतिनिधी**

दि.३० मे २०२५ रोजी अखिल भारतीय गुजर देवसेना संस्था मार्फत गुणवंतांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला या कार्यक्रमाला गुजर समाज देवसेनेचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर, कार्यक्रमाला आवर्जुन उपस्थित असलेले देवसेनेचे संस्थापक अध्यक्ष बालुरामजी गुजर, बन्सीलाल गुजर, मुकेश चावडा, गुजर समाजाचे पहिले जिल्हाध्यक्ष हनुमान बहिरवाळ, गुजर समाज सेवा संघाचे माजी जिल्हाध्यक्ष अर्जुन बहिरवाळ, ॲड.युवराज भैय्या बहिरवाळ, जिल्हा उपाध्यक्ष सुनील गुजर, जिल्हा संघटक अरुण नाना खटाणे, जिल्हा सचिव विनायक गुजर, जिल्हा कोषाध्यक्ष गजानन बहिरवाळ, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख राजेंद्र गुजर, जिल्हा उपाध्यक्ष अशोक घुशीर, शिरूर तालुकाप्रमुख शहादेव डोंगर, तुकाराम डोंगर, बाळू डोंगर, सुनिल बहिरवाळ, नारायण बहिरवाळ, लक्ष्मण बहिरवाळ, लहू दहे, पिनु डोंगर, हलीम पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती.





सदरील कार्यक्रमात जिल्हाध्यक्ष रतन गुजर म्हणाले की, गुजर समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाचे महत्व समजून स्वकर्तुत्व आणि स्वकष्टाने स्वतः च स्वाभिमानाच साम्राज्य निर्माण करुन समाजाच्या बौद्धिक आर्थिक सामाजिक प्रगतिला हातभार लावावा तसेच शिक्षणामध्ये काही अडचण आल्यास तो प्रश्न तुमचा नाही तो प्रश्न सर्व समाजाचा असे समजून आम्ही तुम्हाला समाजामार्फत सहकार्य करु असे आश्वासन दिले.तसेच आई-वडिलांनी मुलाकडे लक्ष देणे गरजेचे आहे आपण मुलांना वेळ देणे गरजेचे आहे त्याच्या समस्या काय आहेत ते समजून घेणे गरजेचे आहे त्याची आवड निवड समजून घेणे गरजेचे आहे विद्यार्थी हा मातीचा गोळा आहे त्याला घडवणे प्रथम आई वडील नंतर शिक्षक एकदा विद्यार्थी बारावीच्या पुढे गेला की त्याला समजू लागते मुलींना पण मुलाबरोबर शिकवा प्रत्येक क्षेत्रामध्ये मुली कमी नाहीत असा संदेश देवसेनेचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांनी दिला कार्यक्रमाच्या शेवटी आलेल्या उपस्थितांसाठी समाज बांधवांकडून भोजन व्यवस्था करण्यात आली होती. या कार्यक्रमाला गुजर समाजाचे सर्व मान्यवर अनेक समाज बांधव उपस्थित होते.

## कृत्रिम बुध्दीमतेमुळे पत्रकारितेच्या सीमा विस्तारल्या- प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

कृत्रिम बुध्दीमत्तेमुळे पत्रकारितेच्या सीमा विस्तारल्या आहेत, असे मार्गदर्शन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान साचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी केले.



कोकण विभागीय पत्रकारांच्या कार्यशाळेत ’कृत्रिम बुद्धीम त्ता, समाजमाध्यम आणि जबाबदार पत्रकारिता विषयावर श्री.सिंह यांनी मार्गदर्शन केले.

ते म्हणाले, मोबाईलमुळे मोठा बदल घडून आलेला आहे. पत्रकारितेतील कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर फायदेशीर आहे. त्यामुळे कामांमध्ये सुलभता आली आहे. एकाचवेळी ९ भाषांमध्ये लाईव्ह भाषणाचे भाषांतर करता येते, असे सांगून, समाज माध्यमांमध्ये कृत्रिम बुध्दीमत्तेचा अतिरेक, कृत्रिम बुध्दीमत्तेमुळे होणारे फायदे आणि होणारे नुकसान याबद्दल मार्गदर्शन केले. सत्य तुमच्याकडे आहे मात्र एआय ला सत्य काय आहे हे म ाहीत नसते.

श्री. सिंह म्हणाले की, मी स्वत: पत्रकार कुटुंबातून आलो आहे. माझे वडील अधिस्वीकृतीधारक पत्रकार होते. शासनाने मला त्याच विभागात काम करण्याची संधी दिली त्याबद्दल मी शासनाचा ऋणी आहे.

यावेळी कार्यशाळेत उपस्थित पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांची श्री. सिंह यांनी दिलखुलास उत्तरे दिली.

## कुशल व न्यायप्रिय : अहिल्यादेवी होळकर – प्राचार्य पंडित खाकरे

**चौसाळा । प्रतिनिधी**

येथील नवगण शिक्षण संस्थेचे कला व विज्ञान महाविध्यालयात आहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. म हाविध्यालयाचे डॉ. पंडित खाकरे तसेच कनिष्ट विभागाचे उपप्राचार्य प्रा. गणपती ढवळशंख उपस्थित होते.

या वेळी महाविध्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित खाकरे यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच अहिल्यादेवी यांच्या जीवनावर प्रकाश टाकला यामध्ये अहिल्यादेवी होळकर या न्यायप्रिय होत्या त्याचबरोबर सामाजिक व धार्मिक कार्यात त्यांनी कार्य केल्याचा सर्वश्रुत इतिहास आहे त्यांनी आपल्या सैन्यामध्ये पुरुषाबरोबर महिलांचा ही समावेश केला. महिलांसाठी त्यांनी स्वतंत्र तुकडी सामाऊन घेतली शेती आणि शेतकरी यांच्या उद्धारासाठी कार्य केले. त्यांनी आपल्या प्रशासन काळामध्ये योग्य न्यायनिवडा करण्यासाठी तज्ञ, विद्वान, शास्त्री आणि पंडित यांच्या नेमणुका केल्या त्याच प्रमाणे देशामध्ये विविध मंदिरांची उभारणी करून जीर्णोद्धार केला. तसेच नदी घाटांची निर्मिती केली. त्याच बरोबर अंधश्रद्धा निवारण साठी त्यांनी विशेष कार्य केले. त्यांची प्रेरणा आजच्या तरुण तरुणीने घेण्याचे आवाहन केले. या वेळी महाविध्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



## श्री कानिफनाथ चॅरिटेबल ट्रस्ट कार्यालयाचे थाटात उदघाटन



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील ओम चैतन्य कानिफनाथ गड मांडवी संचलित, या चारिटेबल संस्थेच्या कार्यालयाचे उद्घाटन बीड तालुक्यातील जरुड या ठिकाणी ह.भ.प. संदीपान महाराज हसेगावकर यांच्या हस्ते करण्यात आले. गुरुवार दि.२२ मे रोजी सकाळी ११ वाजता अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता निमि त्ताने श्री कानिफनाथ चॅरिटेबल संस्थेचे कार्यालयाचे उद्घाटन यावेळी करण्यात आले. यावेळी स्वामी भारती महाराज म्हणाले की, श्री कानिफनाथ चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. परंपरागत चालत आलेल्या संस्थेच्या कार्यक्रम आम्ही राबवणार असून शहीद अर्जुन काकडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ध्यानमंदिर बांधण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे अर्जुन काकडे यांनी सांगितले. या कार्यालयाच्या उद्घाटनाला कानिफनाथ चॅरिटेबल ट्रस्टची कार्यकारिणी अध्यक्ष स्वामी रामानंद भारती, साध्वी देशमुख संचालिका, स्वाध्वी भारती, या संस्थेचे सचिव अर्जुन भीमराव काकडे,गोरख महाराज गंगावणे, माजी सरपंच मच्छिंद्र शिंदे, संस्थापक अध्यक्ष रामानंद भारती, काशिनाथ काकडे परिसरातील नागरिक आणि कार्यालयाचे उद्घाटक ह.भ.प. संदीपान महाराज हासेगावकर यांच्या हस्ते या कार्यालयाचे उद्घाटन धार्मिक सोहळ्याच्या पद्धतीने पार पाडले.

## सौ.के.एस.के (काकू) कृषी महाविद्यालय, बीड येथील विद्यार्थ्यांची जैवविविधता वन उद्यानाला भेट व प्लास्टिक मुक्त वन अभियान!



**बीड । प्रतिनिधी**

सौ.के.एस.के (काकू) कृषी महाविद्यालय, बीड येथील पर्यावरण विज्ञान व आपत्कालीन व्यवस्थापन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी स्व. उत्तमराव पाटील जैवविविधता वनउद्यान, श्री क्षेत्र नारायण गड,बीड येथे वन व वन जैवविविधतेचा अभ्यास करण्यासाठी भेट दिली.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी वन जैवविविधतेचे महत्त्व सम जून घेतले प्लास्टिक मुक्त वन अभियाना अंतर्गत उद्यानातून प्लास्टिक कचरा गोळा करून स्वच्छतेचा संदेश दिला

विद्यार्थ्यांनी जैवविविधता वन उद्यानातील विविध वनस्पती आणि प्राणी प्रजातीचा अभ्यास केला. वनाचे संरक्षण करणे का आवश्यक आहे हे विद्यार्थ्यांनी या अभ्यासातून प्रत्यक्ष अनुभवले सोबतच विद्यार्थ्यांनी वन जैवविविधता म ोजमाप पद्धतीचे प्रात्यक्षिक घेतले अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांनी उद्यानाला प्लास्टिक मुक्त करण्याचा अभियानात सक्रिय सहभाग घेतला उद्यानातील प्लास्टिक कचरा गोळा करून त्यांनी पर्यावरणाच्या स्वच्छतेचे महत्व अधोरेखित केले अशा अभियानामुळे प्लास्टिक प्रदूषणावर नियंत्रण मिळवता येते आणि पर्यावरण समतोल राखला जातो हा संदेश त्यांनी दिला.

या उपक्रमासाठी म हाविद्यालयाचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंके, प्राचार्य डॉ. एस.पी.मोरे व पर्यावरण विभागातील डॉ. राऊत सर, सौ.मुटकुळे मॅडम आणि इतर सहकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले या भेटीमुळे विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच मिळाले नाही तर पर्यावरणाच्या संरक्षणाचे महत्त्वही त्यांना प्रत्यक्ष कृतीतून समजले

दैनिक मराठवाडा पत्र दि. ३१/०५/२०२५
**टी. सी. हरवला आहे.**
पाढेण खुशी सोमेश्वर या नावाचा Bsc 3rd year चा TC
बीड ते गेवराई प्रवासात हरला आहे.
कोणाला सापडल्यास
**संपर्क मोबाईल नंबर : ९३५६९०६८६४**

दैनिक मराठवाडा पत्र दि. ३१/०५/२०२५
**टी. सी. हरवला आहे.**
परमेश्वर मच्छिंद्र शिंगटे या नावाचा इयत्ता बारावीचा टी.सी
बीड ते गेवराई प्रवासात हरला आहे.
कोणाला सापडल्यास
**संपर्क मोबाईल नंबर : ९६३७५६०४२६**

दैनिक **मराठवाडा पत्र**
epaper.marathwadapatra.com
रविवार, दि.०१ जून २०२५


## य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत कृषि शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी ऑनलाइन नोंदणी आजपासून सुरू

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात नियमित कृषि शिक्षण घेऊ न शकणार्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकरिता यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत मुक्त कृषि शिक्षण केंद्र, सौ. के.एस.के. (काकू) कृषि महाविद्यालय, म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड. येथे नववी किंवा दहावी उत्तीर्ण नवीन तसेच जुन्या विद्यार्थ्यांसाठी मुक्त विद्यापीठाच्या कृषि शिक्षणक्रमास प्रवेश घेण्यासाठी ऑनलाइन नोंदणी दिनांक ०१/०६/२०२५ पासून चालू होणार आहे. तरी आपण ऑनलाइन नोंदणी करण्यासाठी प्रा. बी.बी. तांबोळकर किंवा प्रा. ए.पी. ढोरमारे, यांच्याशी संपर्क साधावा. मो. ९८२३८२८६४५, ९६०४२७६२३४, ९६०४८३३७१५ प्रवेश मिळवण्यासाठी ऑनलाइन नोंदणी करणे अनिवार्य आहे.



*बीड: पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील तसेच अजय सवयी विलास जी बामणे सर एडवोकेट श्रीमती संगीताताई धसे बबलू भाई दादासाहेब कदम सह पत्रकार संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर यांच्या सह बीड शहरातील तमाम प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने अभिवादन करण्यासाठी उपस्थित होते पुण्यश्लोक राजमाता अहिल्या देवी होळकर यांच्या स्मारकाच्या ठिकाणी दीप प्रज्वलित करून मोठ्या उत्साहामध्ये आणि आनंदाच्या वातावरणामध्ये अभिवादन करण्यात आले आणि बीड शहरामध्ये पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहामध्ये साजरी करण्यात आली.*

# 'एमपीएल'मध्ये बीडच्या पाच खेळाडूंची निवड

## बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या पाच खेळाडूंनी महाराष्ट्र प्रीमियर लीग (एमपीएल) स्पर्धेसाठी निवड सुनिश्चित केली आहे. यामध्ये सचिन धस (कोल्हापूर टस्कर्स), ऋषिकेश सोनवणे



(पुणेरी बाप्पा), सौरभ नवले आणि देव नवले (सातारा वॉरियर्स), तसेच समर्थ कदम (रत्नागिरी जेट्स) या खेळाडूंचा सहभाग आहे.

ही निवड केवळ खेळाडूंच्या मेहनतीचे फलित नसून बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या पारदर्शक आणि गुणवत्तेला प्राधान्य देणाऱ्या निवड प्रक्रियेचेही प्रत्यक्ष फलित आहे. अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्रे, ब्रँडेड सुविधा आणि मोठ्या आर्थिक पाठबळाचा अभाव असूनही बीडचे खेळाडू राज्यस्तरावर चमकत आहेत, ही बाब निश्चितच जिल्ह्यासाठी गौरवाची आहे. या यशाबद्दल खेळाडूंना बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर, कार्याध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर, सचिव आमेर सलीम, तसेच महेश वाघमारे, राजन साळवी, इरफान कुरेशी, मनोज जोगदंड, जावेद पाशा, रिजवान खान, शेख आरेफ, अतीक कुरेशी, सुनील गोपी शेट्टी, गोपाल गुरखूदे, सरफराज मोमीन, अक्षय नरवडे, पठाण शाहरुख आदींनी अभिनंदन केले आहे.



*पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३00व्या जयंतीनिमित्त अ.भा.महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष भाऊ राऊत, धनगर समाजाचे नेते रंजित सोन्नर, कुंभार समाजाचे नेते अर्जुन दळे, नितीन राऊत, महात्मा फुले जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अजिंक्य सुरवसे,स्वप्नील शिंदे, महेश सोन्नर, महेश व्यवाहारे, निलेश राऊत, अजय भानोसे आदींसह समता सैनिक उपस्थित होते.*

# सुनंदा प्रशांत कोरडे अहिल्यारत्न पुरस्काराने सन्मानित

## सिद्धेश्वरच्या भारतमाता सभागृहात देखणा सोहळा

**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्मोत्सव समितीच्या वतीने श्रीमती सुनंदा प्रशांत कोरडे यांना अहिल्यारत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संघर्षशील जीवन जगत, आप्तस्वकियांच्या मृत्यूचे दुःख पचवत, सामाजिक जबाबदारी समर्थपणे पार पाडल्याबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यासोबतच संयोजकाच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या १३ महिलांचा पुण्यश्लोक अहिल्यारत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.



माजलगाव येथील सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या भारतमाता सभागृहात हा देखणा व नेत्रदीपक सोहळा पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख होते तर उद्घाटक म्हणून संस्कार भा प्रांताध्यक्ष स्नेहलताई पाठक होत्या. प्रमुख व्याख्याते म्हणून इतिहास अभ्यासक डॉ. अशोक बांगर यांनी अनमोल मार्गदर्शन केले. यावेळी अमरनाथ खुर्पे, डॉ .प्रशांत पाटील, देविदास नागरगोजे, प्रकाश दुग्गड, अभय कोकड, ▶▶ उर्वरित पान २ वर

## लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी ; गट प्रवर्तक महिलांचा सन्मान



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात दि.३१ वार शनिवार रोजी कर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव तर प्रमुख उपस्थिती म्हणून लिंबागणेशचे भुमिपुत्र नवनियुक्त पुरवठा निरीक्षक म्हणून बुलढाणा येथे कार्यरत असलेले प्रथमेश राजेभाऊ गिरे यांची उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भिम टायगर ग्रुप बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांनी केले तर आभार प्रदर्शन ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर यांनी मानले. प्रमुख वक्ते म्हणून डॉ.गणेश ढवळे यांनी कर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा जीवनपट उलगडताना मध्ययुगीन कालखंडात भारताच्या इतिहासात ज्या महान स्त्रिया होऊन गेल्या त्यांच्यामध्ये राजमाता जिजाऊ नंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे अद्वितीय स्थान असुन धार्मिक, सामाजिक आणि राजकीय कर्तृत्वाने भारतभर त्यांनी मोठी किर्ती आणि नावलैकीक मिळवले.

▶▶ उर्वरित पान २ वर

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनकार्यावर आधारित लोकराज्य च्या विशेषांकाचे प्रकाशन

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

चौंडी येथे अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती उत्सव सोहळ्यात आयोजित या प्रकाशन सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार शिवाजी कर्डीले, आमदार नारायण पाटील, आमदार अमोल खताळ, आमदार चित्रा वाघ, आमदार काशिनाथ दाते, आमदार मोनिका राजळे, आमदार सुरेश धस, माजी





आमदार अण्णासाहेब डांगे, माजी आमदार रमेश शेंडगे, प्रा.लक्ष्मण हाके, जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आदी उपस्थित होते.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक आणि 'लोकराज्य'चे मुख्य संपादक ब्रिजेश सिंह यांच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

# महेश नवमी सप्ताह २०२५

## परळी वैजनाथमध्ये युवा माहेश्वरींच्या उपक्रमांची मांदियाळी

**परळी वै. । प्रतिनिधी**

महेश नवमीच्या निमित्ताने युवा माहेश्वरी परळी वैजनाथच्या वतीने १ जून पासून ४ जून २०२५ पर्यंत विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

स्वच्छता मोहीम आणि वृक्षारोपण– महेश नवमी सप्ताहाची सुरुवात १ जून रोजी सकाळी ७.३० वाजता राजस्थानी मुक्तीधाम स्वच्छता मोहिमेने

|| समाज के लिए, समाज के साथ ||

होणार आहे. त्यानंतर सकाळी १० वाजता मुक्तीधाम परिसराच्या सुशोभीकरणासाठी कलर भेट आणि वृक्षारोपण करण्यात येईल. या उपक्रमांतून सामाजिक जाणीव आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला जाणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

बुलेट रॅली आणि दीपोत्सव– २ जून रोजी सायंकाळी ६ वाजता शहरात एक भव्य बुलेट रॅली काढण्यात येणार आहे. राणी लक्ष्मीबाई टॉवरपासून सुरू होऊन स्टेशन रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे वैद्यनाथ मंदिर परिसरात पोहोचेल. त्यानंतर सायंकाळी ७.१२ वाजता मंदिराच्या पायऱ्यांवर दीपोत्सव व सामूहिक महेश वंदना होणार आहे. भक्तीमय वातावरणात दीपमालिकेचा अद्भुत प्रकाश नागरिकांना अनुभवता येणार आहे. सर्वांनी या भक्तिसंगीताने ओतप्रोत कार्यक्रमात सहभागी व्हावे. भक्तिरसात न्हालेली भजन संध्या– ३ जूनच्या रात्री ८ वाजता अक्षता मंगल कार्यालय, परळी येथे भजन संध्या चे आयोजन करण्यात आले आहे. सुप्रसिद्ध पं. श्री उत्तमजी महाराज शास्त्री व पं. श्री निरंजन महाराज शास्त्री यांच्या मधुर भजनांच्या सादरीकरणाने महेश नवमीच्या पूर्वसंध्येला भक्तिरसाचा वर्षाव होणार आहे. ही भजन संध्या सर्व श्रद्धाळूंना एकात्मतेचा व अध्यात्मिकतेचा अनुभव देणारी ठरणार असून, सर्वांनी यामध्ये सहभागी व्हावे.

▶▶ उर्वरित पान २ वर

# श्रीक्षेत्र बाभळगाव येथील हनुमान मंदिर देवस्थानचे विश्वस्त मंडळ जाहीर

### आमदार प्रकाश सोळंके यांची उपस्थिती

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील जागृत देवस्थान म्हणून सुप्रसिद्ध असलेल्या माजलगाव तालुक्यातील श्रीक्षेत्र बाभळगाव येथील हनुमान मंदिराच्या विश्वस्त मंडळाची कार्यकारिणी निवडण्यात आली आहे. धर्मादाय कार्यालयाकडे देवस्थान ट्रस्टची



नोंदणी करण्यात आली असून आमदार प्रकाश सोळंके यांच्या उपस्थितीत कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

विश्वस्त मंडळाच्या अध्यक्षपदी शिवाजी तुळशीराम डाके, उपाध्यक्षपदी बाजीराव श्रीमंतराव लाटे, सचिव चंद्रकांत सुरेश लाटे, कोषाध्यक्ष मारुती महाराज सुरवसे, सहसचिव पंजाब राधाकिसन लाटे यांची निवड करण्यात आली आहे. तर इंद्रजीत नामदेव लाटे, अभिनव रामराव लाटे, एकनाथ मदनराव लाटे,

▶▶ उर्वरित पान २ वर



*प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात माँसाहेब जयंती साजरी: नेकनूर (प्रतिनिधी)माऊली विद्यापीठ केज संस्थेचे माननीय संस्थापक अध्यक्ष आमचे प्रेरणास्थान आदरणीय माजी मंत्री मा. अशोकराव पाटील साहेब ( दादासाहेब ) यांच्या मातोश्री कै. प्रमिलादेवी शंकरराव पाटील ( माँसाहेब ) यांच्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ढास डी. के. महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.*

## आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी कार्यभार स्वीकारला

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

नूतन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज आपल्या पदाचा कार्यभार स्विकारला. सेवानिवृत्त होत असलेले विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्याकडून त्यांनी▶▶ उर्वरित पान २ वर

